# - प्रकरण पहिले -

## संशोधन पध्दती व अंक संकलन

१.१ प्रस्तावना

१.२ अभ्यासाची उद्दिष्ट्ये

१.३ अभ्यास पध्दती

१.४ तथ्य संकलन

१.५ अभ्यासाची योजना

# प्रकरण पहिले

## संशोधन पध्दती व अंक संकलन

### १.१) प्रस्तावना :-

जगातील सहकारी पतपुरवठा चळवळीची जर्मनी ही जन्मभूमी आहे. याही देशात गरजेचे अपत्य म्हणूनच सहकारी चळवळ उदयास आली. कालांतराने या चळवळीचे लोण संपूर्ण जगभर पसरले.

भारतात शेती सहकारी बँकांचा उगम गरीब लोकांना व विशेषतः लहान व सीमांत शेतकरी यांना लागणाऱ्या उत्पादक कर्जाच्या गरजेतून झालेला आहे. शेती सहकारी बँकांनी शेती विकासात अत्यंत महत्वाची भूमिका बजावल्या मुळे त्यांचा अभ्यास करणे जरुरीचे आहे. या प्रबंधात सर्वच शेती सहकारी बँकांचा अभ्यास करणे शक्य नसल्यामुळे श्री पैसाफंड शेतकी सहकारी बँकेचा एक विशेष अभ्यास केला आहे. बँकेचे चेअरमन, मॅनेजर, अकौंटंट, संचालक मंडळ, अधिकारी वर्ग यांच्या बरोबर चर्चा करुन तसेच निरनिराळे वार्षिक अहवाल, रौप्य मोहत्सवी अंक, प्रधान कार्यालयातील ऑफिस रेकॉर्ड प्रवक्त्या बरोबर चर्चा इत्यादी मार्गांनी तथ्य संकलन केले आहे.

प्रस्तुत लघुशोध प्रबंधासाठी श्री पैसाफंड शेतकी सहकारी बँक लि., हुपरी या बँकेची हेतुपुरस्सर निवड केली आहे. या बँकेचा रौप्य मोहत्सव सन १९७८ साली पार पडला. आज बँक स्थापन होऊन चव्वेचाळीस वर्षे झाली. या चव्वेचाळीस वर्षाच्या काळात बँकेने शेती, शिक्षण, सामाजिक सेवा आणि वैद्यकीय सेवा या सर्वच क्षेत्रात भरीव कार्य केले आहे आणि विशेष म्हणजे चव्वेचाळीस वर्षातील प्रगतीचा आराखडा उपलब्ध होऊ शकला म्हणून या बँकेच्या अभ्यासाचे

महत्व वाटल्यावरून या बँकेची निवड केली आहे.

## १.२) अभ्यासाची उद्दिष्ट्ये :-

१. इतर बँकेपेक्षा श्री पैसाफंड शेतकी सहकारी बँकेची कार्य कशी वेगळी आहेत, याचा अभ्यास करणे.

२. लाभधारकांच्या सामाजिक आर्थिक परिस्थितीत सुधारणा करण्यात बँकेची भूमीका काय आहे, याचा अभ्यास करणे.

३. सन १९५० ते १९९३ या कालावधीतील या बँकेच्या सभासद, वसूल भाग भांडवल, खेळते भांडवल, ठेवी, कर्ज वितरण, राखीव निधी, गुंतवणूक, नफा, उत्पन्न, खर्च, बँक चालविण्याचा खर्च, थकबाकी, शाखा विस्तार, लाभांश दर व सेवक वर्ग इत्यादी घटकांचा अभ्यास करणे.

## १.३) अभ्यास पध्दती :-

शेती सहकारी बँकांचे सूक्ष्मलक्षी संपादनात्मक विश्लेषण करताना सर्वच बँकांचा अभ्यास करणे अशक्य आहे आणि त्यामुळेच प्रस्तुत अभ्यासासाठी हातकणंगले तालुक्यातील हुपरी गावातील "श्री पैसाफंड शेतकी सहकारी बँक लि., हुपरी" या बँकेची निवड केली आहे.

प्रारंभी श्री पैसाफंड बँकेच्या स्थापनेपाठीमागे असलेला संपूर्ण इतिहास तपासून पाहण्याचा प्रयत्न केला आहे. त्यानंतर श्री पैसाफंड बँकेचा विविध क्षेत्रातील प्रगतीचा आलेख तपासून पाहण्याचा प्रयत्न केला आहे. यासाठी १९५० ते १९९३ पर्यंतच्या समग्र आकडेवारीचा उपयोग करून घेतला आहे. शेती क्षेत्रातील कार्य, वैद्यकीय सामाजिक सेवा, शैक्षणिक कार्य आणि वैद्यकीय सल्ला

इत्यादी क्षेत्रातील बँकेच्या कार्याचा आढावा क्रमाक्रमाने घेतलेला आहे. त्याचप्रमाणे ठेवी, कर्ज वितरण, उत्पन्न, खर्च, नफा, लाभांश, सभासद, भाग, भांडवल इत्यादी क्षेत्रातील बँकेचा विकास क्रमाक्रमाने मांडलेला आहे. असे करीत असताना मागील वर्षाच्या तुलनेने चालू वर्षाची स्थिती कशी आहे हेही पाहिले आहे आणि शेवटी बँकेच्या सक्षमतेच्या आणि लाभप्रदतेच्या गुणोत्तराचा अभ्यास करून बँकेच्या संपादनात्मक अभ्यासाची चिकित्सक माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला आहे.

१.४) <u>तथ्य संकलन</u> :-

प्रस्तुत प्रबंधाचे लेखन करीत असताना आवश्यक असणारी अत्यंत उपयुक्त माहिती, आधार, संदर्भ, अंक संकलन इत्यादीसाठी वेगवेगळ्या मार्गाचा अवलंब करावा लागतो.

१. सदर संशोधनासाठी बँकेची माहिती मिळविण्यासाठी संचालक मंडळ, चेअरमन, मॅनेजर, चीफ अकौंटंट, अधिकारी वर्ग तसेच बँकेतील दीर्घानुभवी कर्मचारी वर्ग व बँकींग क्षेत्रातील इतर अनुभवी लोक यांची प्रत्यक्ष भेट घेऊन अभ्यासाचा हेतू स्पष्ट केला व त्यासंबंधित विषयावर चर्चा केली. यामुळे अंक संकलन सोपे झाले. प्रस्तुत शोधप्रबंधासाठी १९५० ते १९९३ या काळातील वार्षिक अहवाल तपासून पाहिले. त्यावरूनच आवश्यक माहिती संकलित केली. दुय्यम स्वरूपाचे संदर्भ, ग्रंथालय, स्मरणीका याद्वारे मिळविले आहेत.

२. सदरच्या अभ्यासासाठी दुय्यम सामुग्रीचा उपयोग केला आहे.

३. श्री पेसाफंड शेतकी सहकारी बँक लि., हुपरी याचा रौप्य महोत्सवी अंक व संबंधित वर्षाचे प्रसिध्द झालेले अहवाल.

४. सभासदांच्या जबाबदारीवर चालविलेल्या विभागाचे वार्षिक अहवाल.

५. श्री पैसाफंड सहकार पत्रिका इत्यादींच्या माध्यमातून माहिती संकलित केली आहे.

## १.५) अभ्यासाची योजना :-

सदरच्या प्रबंधात अभ्यासाची खालील दहा प्रकरणात विभागणी केली आहे.

पहिल्या प्रकरणात अभ्यासाची उद्दिष्ट्ये मांडून अभ्यास पध्दती सांगितलेली आहे.

दुसऱ्या प्रकरणात सर्वसाधारणपणे भारतातील शेती क्षेत्रासाठी कर्ज पुरवठा याविषयी विवेचन केले आहे.

तिसऱ्या प्रकरणात श्री पैसाफंड बँकेच्या स्थापनेसाठी प्रेरणा, पार्श्वभूमी आणि स्थापना यांचे विवेचन केले आहे.

चौथ्या प्रकरणात श्री पैसाफंड शेतकी सहकारी बँकेची शेती विकासातील कार्याचा सविस्तर अभ्यास केला आहे.

पाचव्या प्रकरणात बँक करीत असलेल्या विविध सामाजिक कार्याची माहिती दिली आहे.

सहाव्या प्रकरणात बँक देत असलेल्या विविध वैद्यकीय सुविधांची माहिती दिली आहे.

सातव्या प्रकरणात बँक करीत असलेल्या शैक्षणिक कार्याची सविस्तर चर्चा केली आहे.

आठव्या प्रकरणात श्री पैसाफंड शेतकी सहकारी बँकेच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेतला आहे.

नवव्या प्रकरणात काही प्रमाणकांचे विश्लेषण दिले आहे.

आणि दहाव्या प्रकरणात सारांश दिलेला आहे.